# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
## दापोली ४१५ ७१२, जिल्हा — रत्नागिरी

ळतंउ रू ज्ञव्छज्ञ।छ।ळत्प्ए क्ंचवसप
फॅक्स : ०२३५८—२८४३९३

दूरध्वनी : एसटीडी ०२३५८
कार्यालय : २८२०२६ विस्तार १०५


# नागरीकांची सनद (प्रारुप)

**प्रस्तावना :**

१. भारत हा कृषि प्रधान देश असल्याने देशाची बहुतांश आर्थिक प्रगती प्रामुख्याने शेतीच्या उत्पादनावर अवलंबून असते. शेती हे प्राथमिक क्षेत्र असल्याने शेतीचा विकास शास्त्रीय पध्दतीने करुन नविन तंत्रज्ञानाचा फायदा शेतीसाठी व शेतकऱ्यांसाठी व्हावा यासाठी कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. या कृषि विद्यापीठाच्या कार्याचा मूळ उद्येश कृषि शिक्षण, कृषि संशोधन व कृषि विस्तार शिक्षण असून, कृषि क्षेत्रातील कार्यक्षम मनुष्यबळ निर्माण करुन त्याचा उपयोग कृषि, कृषि अभियांत्रिकी, मत्स्य आणि वन विभाग या क्षेत्रामध्ये उपलब्ध करुन देणे हे आहे. या व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनास निरनिराळे कृषि विषयक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तांत्रिक सल्ला देणे, तसेच अखिल भारतीय स्तरावर संशोधन करण्यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, यांच्यामार्फत कृषिच्या संदर्भातील धोरणे राबविण्यासाठी सहाय्य करणे.

२. कृषि विद्यापीठात विकसित झालेले तंत्रज्ञान, कृषि खाते आणि सुधारित वाणांचे बियाणे, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळामार्फत शेतकऱ्यांपर्यन्त पोहोचविले जाते. विद्यापीठात विकसित झालेल्या कृषि तंत्रज्ञानाच्या विस्ताराची जबाबदारी ही शासनाच्या कृषि खात्याकडे आहे. कृषि विद्यापीठांकडे विस्तार शिक्षणाचा महत्वाचा भाग असून त्याद्वारे विस्तार कार्यकर्ते, ग्रामविस्तारक, विषय विशेषज्ञ, विविध खात्यातील अधिकारी, शेतकरी आणि शेतकरी महिला यांना प्रशिक्षण दिले जाते. लिखित साहित्य, प्रसार माध्यमे, विविध संपर्क पध्दतीद्वारे कृषि विषयक माहिती प्रसारीत केली जाते.

३.  कृषि विद्यापीठाचे प्रमु.ख उद्‌दीष्ट कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण हे असल्याने या विद्यापीठाकडून कृषि विषयाशी संलग्न परंतु वाणिज्यिक स्वरुपातील थेट सेवा जनतेस पुरविल्या जात नाहीत किंवा तसा सेवा पुरविण्याचा परस्पर संबंध येत नाही. तथापि, कृषि विद्यापीठाकडून खालील मुद्यांबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात येते आणि त्यांच्या समस्या सोडविणेसाठी मार्गदर्शनाचे काम केले जाते.

**४. विद्यापीठाकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवा :**

१. **माती परिक्षण** : मातीचा नमुना प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रयोगशाळेत परिक्षण करुन अहवाल दिला जातो. ही सेवा विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरात पुरविली जाते. अशी सेवा कृषि महाविद्यालय,दापोली, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेगुर्ला आणि प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथे उपलब्ध आहे.

२. **पाणी परीक्षण** : पाण्याचा नमुना प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रयोगशाळेत परिक्षण करुन अहवाल दिला जातो. ही सेवा विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरात पुरविली जाते. अशी सेवा वर नमूद केलेल्या ठिकाणी उपलब्ध आहे.

३. **पिकांचे फिरते चिकित्सालय** : पिकांचे फिरते चिकित्सालयाद्वारे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सर्व विभागीय केंद्राद्वारे व फिरत्या प्रयोगशाळेमार्फत पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार संबंधित गावामध्ये जाऊन शेतकऱ्यांनी आणलेले माती व पाण्याचे नमुने तपासले जातात. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी आणलेले पिंकचे नमुन्यांचे कीड व रोग प्रादुर्भावाचे निदान करुन त्यांना त्यावर कीड व रोग नियंत्रणाचे उपाय सुचविले जातात.

**५. मार्गदर्शन व सल्ला :**

१. केंद्र/राज्य शासन/ भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून आखून आलेल्या प्रमाणकानुसार व विषयानुसार शेतकरी प्रशिक्षण/मेळावा/चर्चासत्र आयोजित करुन कृषि माहिती व तंत्रज्ञान पुरविणे, मार्गदर्शन करणे, कृषि विषयक तांत्रिक समस्या सोडविणे.

२. दूरभाष्य सेवा : विद्यापीठाच्या कृषि माहिती व तंत्रज्ञान केंद्रातील विविध विषय तज्ञांकडून सकाळी ०८.०० ते १२.०० आणि दुपारी २.३० ते ६.४५ या वेळात दूरध्वनी क्रमांक ९५—२३५८—२८०२३८ आणि किसान कॉल सेंटर ९५—२३५८—२८०२३८ वरुन कृषि विषयक प्रश्नांची उत्तरे व मार्गदर्शन केले जाते.

३. आकाशवाणी व दूरदर्शनवरुन वेळोवेळी शेतीविषयक माहिती प्रसारीत केली जाते.

४. छपाई माध्यमातून उदा. प्रतिवर्षी कृषि दैनंदिनी, विविध घडीपत्रिका, माहितीपुस्तिका इत्यादी (ही प्रकाशने विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरात तसेच काही माहितीपुस्तिका विनामूल्य पुरविली जातात). तसेच विविध चर्चासत्रे, मेळाव्यांमध्ये त्या त्या विषयाबाबत मार्गदर्शक पुस्तिका, घडीपत्रिका इत्यादी प्रकाशनाद्वारे व वृत्तपत्रातून लेख प्रसिध्दी करुन माहिती व मार्गदशन केले जाते.

**६. कृषि विषयक माहिती पुरविणे :**

१. कृषि प्रदर्शनातून व फोटो गॅलरीच्या माध्यमातून कृषि विषयक माहिती दिली जाते.

२. व्हिडीओ/सीडीद्वारे कृषि माहिती प्रसारीत केली जाते.

३. संगणक/इंटरनेटवरुन सर्व विकांची व इतर माहिती पुरविणेची मोफत सुविधा

४. कृषि औजारे व यंत्रांचा वापर करणेबाबत माहिती पुरविणे.

५. कृषि विषयक माहिती देणेसाठी दापोली येथे कृषि तंत्रज्ञान व माहिती केंद्रांची स्थापना केली आहे. तसेच स्वयंसेवी संस्था वा इतर मंडळांमार्फत आयोजित केलेल्या मेळावे, येथे कृषि प्रदर्शनांमार्फत शेतकऱ्यांना माहिती देण्यात येते.

**७. कृषि विषयक उत्पादन विक्री :**

१. विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध शेती पिकांच्या वाणांचे विद्यापीठ प्रक्षेत्रावर उत्पादित बियाणे उपलब्धतेनुसार मुख्यालय तसेच संलग्न संशोधन केंद्रावर विक्रीसाठी उपलब्ध केले जाते. सन २००५—०६ मध्ये ३९७४ क्विंटल बियाणाचे उत्पादन करण्यात आले आणि यावर्षी (२००६—०७

एकूण ४०५६ क्विंटल बियाणे उत्पादन करण्यात आले. या शिवाय मत्स्य बीजही उपलब्ध केले जाते.

२. कलमे/रोपे तयार करुन विक्री केली जाते. सर्वसाधारणपणे प्रतिव र्ी बारा लाख कलमे/रोपे तयार करुन विद्यापीठाने निश्चित केलेल्या दराने शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिली जातात.

३. शेतकऱ्यांना शेळी, देशी कोंबडयांची अंडी (गावठी कोंबडयाकडून संकरीत प्रजननाकरीता), मांसल कोंबडया, दूध, अंडी इत्यादी विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरानुसार पुरविण्यात येतात. तसेच शेणखत, गांडूळ खताची विक्री करण्यात येते.

**८. शैक्षणिक :**

वरील परिच्छेदात दिलेले कार्यक्रम राबवित असताना विद्यापीठातील शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थी, विद्यार्थीनींना प्रवेश देण्याची कार्यवाही प्रचलित नियमांच्या तरतूदीनुसार, कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे नियंत्रणाखाली पूर्ण केली जाते. या विद्यापीठांतर्गत कृषि व संलग्न विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका व माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो आणि कृषि, उद्यानविद्या, वन, मत्स्य, व कृषि अभियांत्रिकी संबंधित विविध विषयांचा अभ्यासक्रम शिकविला जातो. तसेच राष्ट्रीय स्तरावरील नामांकित शैक्षणिक संस्थाशी सामंजस्य करार करुन कृषि व संलग्न विषयामध्ये उच्च शिक्षणासाठी संधी प्राप्त करुन दिली जाते.

**९. संशोधन :**

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत एकूण तीन हवामान पट्टयांमध्ये एकूण १८ संशोधन केंद्रे व वाकवली या ठिकाणी मध्यवर्ती प्रक्षेत्र आहे. या संशोधन केंद्रावर खालीलप्रमाणे विविध शेती पिकांवर संशोधन सुरु आहे.

१. तृणधान्य — भात, नागली, वरी

२. कडधान्ये — वाल, चवळी, तूर, कुळीथ, मूग, मटकी

३. गळीत धान्ये — भुईमूग, कारळा, सोयाबीन, मोहरी, सूर्यफूल

४. नगदी पिके – केळी, ऊस,

५. फळपिके – आंबा, काजू, नारळ, कोकम, चिकू, सुपारी, आवळा, करवंद, कलिंगड, केळी.

६. भाजीपाला पिके – वांगी, मिरची, टोमॅटो, काकडी, पडवळ, दोडका, भेडी, पालेभाज्या (पालक, माठ)

७. फुलझाडे – जरबेरा, ऑर्किड

८. चारा पिके – चवळी, मका, धसरी, पेटाकुली

९. औषधी व सुगंधी वनस्पती – आवळा, उंडी, बहाक, कोरफड, व्हॅनिला, शतावरी

१०. विविध पशुधन – गाई, म्हशी, शेळया, इमू, कोंबडया

११. शेतीची यंत्रसामुग्री व औजारे – काजू फोडणी कात्री, फणस गरे चिरण्याचे–कापण्याचे यंत्र, ट्रॅक्टर, मळणी यंत्र, कोकम फळे कापण्याचे यंत्र, काजू बोंडांचा रस काढण्याचे यंत्र, स्वस्तिक औजार, अतुल (चिकूसाठी) झेला, आंबा फळे काढणी झेला, इ.

१२. मत्स्य : कोळंबी, खेकडे, गोडया पाण्यातील मासे, शोभिवंत मासे इ.

या संशोधनांतर्गत विविध पिकांचे संकरीत व सुधारीत वाणांचा विकास करणे, त्यांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे, विविध फळझाडांची कलमे/रोपे तयार करणे, विविध पिकांच्या पीक व्यवस्थापन, पीक उत्पादन व पीक संरक्षण इत्यादी बाबींवर संशोधन करुन त्याविषयी शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केल्या जातात.

कृषि अभियांत्रिकी शाखेमध्ये विविध शेतीची औजारे व यंत्रसामुगी यांचा विकास करण्यात येतो. तसेच खार जमीन सुधारणा, जलसिंचन पध्दती, पाणी व्यवस्थावपन पध्दती, खतांच्या मात्रा, शेतीमाल प्रक्रिया, मत्स्य शेती इत्यादी विषयांवर संशोधन केंले जाते.

कृषि क्षेत्रातील अनेक बाबी विचारात घेऊन संबंधित विषयातील ज्ञान व तंत्रज्ञान विकसित करणेसाठी तसेच उन्नत जातीचे विविध वाण व संकरीत वाण तयार करणेसाठी संशोधन केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या संशोधन

केंद्रातील संशोधनाचा उपयोग शिक्षणासाठी व प्रत्यक्षात शेतकऱ्यांकडून  ोतीमध्ये वापर करणेसाठी केला जातो.

**१० शेतकऱ्यांच्या अपेक्षा :**

१. विद्यापीठास भेट देणाऱ्या किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क साधणाऱ्या शेतकऱ्यांस त्यांचे समाधान होईल अशा सोप्या व त्यांना समजेल अशा भाशेत माहिती देण्यात यावी. यासाठी विद्यापीठात कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र कार्यान्वित करण्यात आले असून अधिकारी/कर्मचारी त्यांच्याशी सौजन्याने वागतील व सभ्यपणे वागणूक मिळेल यासाठी प्रयत्नशील राहातील.

२. विद्यापीठाकडून केल्या जाणाऱ्या विक्रीमध्ये (उदा. बियाणे, प्रकाशने, रोपे इ.) विश्वासार्हता राहील आणि शेतकऱ्यांचे हित जोपासले जाईल हा मूळ उद्येश असेल.

३. शेतकऱ्यांस केले जाणारे मार्गदर्शन, सल्ला व इतर माहिती उपलब्ध साधनांचा पुरेसा वापर करुन तत्परतेने व कोणतीही तक्रार राहाणार नाही, अशा रितीने करणेसाठी हे विद्यापीठ वचनबध्द राहील.

**११. तक्रारीचे निवारण :**

वरील विषयाच्या अनुषंगाने सेवा, सल्ला किंवा माहिती अथवा मार्गदर्शनाचे काम सुरळीतपणे न झालेस खालील अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविल्यास त्याची तातडीने दखल घेऊन उपाययोजना केली जाईल.

१. संचालक विस्तार शिक्षण, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२. संचालक संशोधन, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
३. संचालक शिक्षण, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
४. सहयोगी अधि  ठाता, कृषि वनशास्त्र/ कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली /मत्स्य महाविद्यालय, रत्नागिरी
५. सहयोगी संशोधन संचालक प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ले / प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत
६. संचालक, मध्यवर्ती प्रक्षेत्र वाकवली, ता. दापोली.
७. कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली